# मानवते चा संदेश

## चाल: क्या मिलिये ऐसे लोगो से जिनकी

मानवतेला अंगी कारून, जन्माचा उद्धार करू
ज्ञान आणि कर्माच्या संगे, जीवनाचा शृंगार करू...||ध०||

एका प्रभूची लेकरे आपण,मिळून सारे राहूया
सदाचाराची, सद्कर्माची, धुरा हि आपण वाहुया
अप-काराची वृत्ती नसावी, सदोदित परोपकार करू...||१|| ज्ञान आणि

धर्म जोडतो तोडत नाही,परी भाषा हि धर्माची
शिकवण देई सत्य अहिंसा, प्रेम विनय सु कर्माची
माणुस बनुनी माणसाचा, आदरे सत्कार करू...||२|| ज्ञान आणि

थेंब थेंब आपल्या रुधीराचा, सत- कार्याशी लागावा
रक्ताच्या जीवन दानाने, समाज अवघा जागावा
व्यर्थ ना सांडो रक्त कुणाचे, मनोमनी विचार करू...||३|| ज्ञान आणि

सत्य वचन हे गुरु मातेचे,मानूनि स्विकार करू
मन हे मंदिर होण्या साठी, सारे दूर विकार करू
स्वप्न हे मोठे गुरु देवाचे,आज चला साकार करू...||४|| ज्ञान आणि

ज्ञानी असुनी अज्ञानाच्या, त्या वाटेने जाऊ नका
"परशुरामा" तम अंधारी, उगाच ठोकर खाऊ नका
गुरु समिप समर्पण करुनी, स्वर्ग मय संसार करू...||५|| ज्ञान आणि



कवी: परशुराम कारंडे 'समिप'